VOL- VI ISSUE-XII DECEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# ख्रिस्ती ज्यू आणि अरबी वैद्यकांचाइतिहास:-एक चिकित्सा

विश्वास गोरखनाथ वळवी

**प्रस्तावना:-**

प्राचीन काळापासून वैद्यांचे कार्य हे अमुल्य स्वरूपाचे होतेभारतात आयुर्वेदाला पाचवा वेद म्हटले जाते.प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीत अनेक प्रकारचे वैद्य आणि वैद्यकीय औषधींची रचना केलेली आढळते.वैद्य हे धर्माच्या आणि जादू-टोनाच्या नावाने त्याकाळी प्रसिध्द होते,आधुनिक वैद्यक विज्ञानाची सुरुवात त्यातूनच झालीफरक एवढाच कि आज वैद्यकीय क्षेत्र जागतिक बनले आहे.पण आजदेखील जागतिक समाजात अशी मंडळी आणि प्रथा आहे जेथे प्राचीन वैद्यकीय पद्धतीने उपचार केले जातेख्रिस्ती यहुदी,ख्रिस्ती आणि अरबमध्ये वैद्य आणि त्यांनी कोणत्या प्रकारे उपचार केले त्यांच्या उपचाराच्या पद्धती कोणत्याहोत्या धर्मगुरू नंतर वैद्यांना किती मानसन्मान दिला जात असे या सर्व गोष्टी संशोधकाने या शोधनिबंधाचा माध्यमातून प्रकट करण्याच्याप्रयत्न केलेला आहे.

**ख्रिस्ती धर्म आणि वैद्य:-**

"ख्रिस्ती धर्माच्या प्रचाराबरोबरच त्याचे रोगनिवारणाचे कार्य *श्रद्धाधिष्ठित* पद्धतीने सुरू होते.आजार व इतर दुर्देवी घटनांनी मानसाचा आत्मा शुद्ध होतोआजार हे पापांची शिक्षा म्हणून परमेश्वराने पाठविलेले अरिष्ट असते.त्यावर मानवी उपचारांनी फारसा परिणाम होत नाही.अशा ठाम विश्वासामुळे वैद्यकाच्या आधीभौतिक किंवा निसर्गाधिष्ठित पद्धतीकडे हा धर्म उदासीनतेने पाहत असे,त्याऐवजी विविध संतांच्या रोगहारक शक्तीच्या चमत्कारांवर भर दिला जाई, अकराव्या शतकात *हिल्डीगार्ड* यांनी मात्र असे प्रतिपादन केले की,रोगग्रस्त शरीर सैतानाच्या कारवायांना सहज बळी पडते.त्यानंतर ऐहिक शारीरिक उपचारांचा हळूहळू स्वीकार होऊ लागला.."१ ख्रिस्ती धर्मात चमत्कारा विश्वास ठेवला जात असे पण तो धर्माच्या माध्यमातून,येशू ख्रिस्ताने अनेक चिन्हे आणि चमत्कार केल्यामुळे त्याकाळी वैद्यांना दुय्यम स्थान दिले जात असेपुढे मंडळीच्या विकासाबरोबर अनेक संत ख्रिस्ती धर्मात निर्माण झाले लोक त्यांनी पूजा अर्चना करू लागलेख्रिस्ती धर्मात मूर्तिपूजेचे शिरकाव झाल्यामुळेचमत्काराचे स्तोम माजले आणि वैद्यांचा कोणी विचारही करत नसे त्यामुळे ख्रिस्ती धर्मात सुरुवातीला आणि धर्मसुधारणा होण्याआधी अनेक ख्रिस्ती धर्म वैद्य आणि वैद्यकीय क्षेत्रापासून थोडे लांब होतेकारण ख्रिस्ती धर्म सांगते **''देहाचे चिंतन हे मरण आहेपण आत्म्याचे मनन हे जीवन आणि शांती आहे"२** या काळात *आरस्क्लेपियाडीझ पंथी* आणि *हिप्पोक्रोटिझ पंथी* वैद्यकीय व्यवसायिकांशी ख्रिश्चन वैद्यकाला स्पर्धा करावी लागत होती.हळूहळू या दोहोमधील काही भाग या धार्मिक वैद्यकाने आपणात समाविष्ट करून घेतले.उदा मंदिरातील *स्वप्नोपचार* आणि *गेलेन* यांची औषधे हे दोन्ही मार्ग उपचारासाठी वापरले जाऊ लागले.रोमन काळात हिप्पोक्रोटिझ यांच्या आणि इतर ग्रीकांच्या ग्रंथाची लॅटिनमध्ये भाषांतरे झाली..''३ .वैद्यकीय पुस्तकांचा संग्रह आणि अनुवाद यामुळे लोकांचा ज्ञानात भर पडली आणि वैद्यकीय शास्राचा विकास झाला.धार्मिकतेची स्वप्नपद्धती आणि गेलेन यांची आधुनिक वैद्यकीय पद्धतीमुळे वैद्यकीय शास्राचा विकास घडून आला.मध्ययुगीन कालखंडात या पद्धतीमुळे वैद्यकीय शास्राने खरी उंची प्राप्त केली आणि त्याला पुढे जाऊन विज्ञानाची जोड मिळाली.

**अरब आणि त्यांची वैद्यकीय पद्धत:-**

"एवढेच नव्हे तर सातव्या-आठव्या शतकात मुस्लिम आक्रमणानंतर त्यांचे अरबी भाषेत रूपांतर होऊन प्रशियन वैद्यकावरही त्याचा प्रभाव पडला. *अबू बक्र मुहम्मद झकारिया अर (अल) राझी* बांधले व स्वतः सु.१,४०० पुस्तके लिहिली अरबी वैद्याचे राजे समजले जाणारे *अबुल अल हुसेन इब्न अब्दला इब्न सीना उर्फ अव्हिसेना* (९८०-१०३७-इब्न सीना) हे राजवैद्यही ग्रँथलेखनाबद्दल असेच प्रसिद्ध आहेत.या दोघांनीही अरबी वैद्यकाच्या विकासात मोठा हातभार लावला

अरबांचा *औषधिसंग्रह* ताप व डोळयांच्या विकारावरील संशोधन रसायनातील *उधर्वपातणव सम्प्लवन* (घनरुपातून द्रवरूपात न जाता एकदम वायुरूपात जाण्याची क्रिया) यांसारख्या प्रक्रिया अनेक पारिभाषिक शब्द (अल्कोहॅाल, ड्रग,शुगर इत्यादीसारखे) इत्यादीमुळे या वैद्यकाचा प्रभाव पाश्चात्य विज्ञानावर बराच पडला आहे."४.मुस्लीम धर्माचे खरे प्रस्त हे इसवीसनाच्या सातव्या शतकापासून संपूर्ण जगाने अनुभवले,ख्रिस्ती धर्माप्रमाणेच मुस्लीम धर्म देखील ज्यू धर्मातून अस्तित्वात आला.पण ख्रिस्ती धर्माप्रमाणे त्याने देखील आपले वेगळे स्वरूप तयार केले.मुस्लीम साहित्य आणि त्यांची समाजरचना काळानुसार बदलत गेली

"अकराव्या शतकात ग्रीक ग्रँथांची अरबी भाषांतरे इटीलीतील सालेर्नो येथे आणण्यात आली,येथे सर्व संस्कृतीच्या संगम होत असे *कांसन्स्टीन या धर्मगुरूंनी अरबी भाषांतरावरून लॅटीन ग्रँथ तयार केले आणि सालेर्नो येथे पहिला वैद्यकीय विद्यालयाची स्थापना केली*. त्याच्याच धर्तीवर नंतर युरोपभर *बोलोन्या,पाडुआ,मौट पील्यर,औक्सफर्ड,केम्ब्रिज* इ.विद्यापीठामध्ये वैद्यकीय संस्था निर्माण झाल्या.ग्रीक संस्कृतीच्या मध्ययुगीन युरोपवर इष्ट असापरिणाम झालेला या काळात दिसतो.परंतु वैद्यकीय ज्ञान मात्र गेलेकालीन अवस्थेतच राहिले.कारण प्रयोग, *शवविच्छेदन* इत्यादिंचे स्वातंत्र्य नव्हते." ५ वैद्यकीय साहित्याचे वेगवेगळ्या भाषात भाषांतरण झाल्यामुळे विज्ञानाचा देखील विकास घडून आला.ग्रीक,रोमन,अरब,यांच्यात वैद्यकीय साहियाची वाटणी झाल्यामुळे त्याला महत्व प्राप्त झाले.

**ज्यू आणि त्यांची वैद्यकीय पद्धत-**

"ख्रिश्चन वैद्यकाच्या काळात ज्यू धर्मियांना इजिप्तकडून ज्ञानाचा वारसा मिळाला.परंतु त्याचे वैद्यक धर्मापासून पूर्णपणे स्वतंत्र राहिलेवैद्याना पुरोहितापेक्षा कनिष्ठ दर्जाचे लेखले जाई. पण कामाचा मोबदला मात्र योग्य प्रकारे मिळत असे.यातुविद्येचा वापर काही प्रमाणात होत असे,पण तो धर्माशी निगडीत नव्हता.जुने ते सर्व टाकून देण्याची क्षमता या कालखंडात कुठेही आढळत नाही"६ अरब लोकांना वैद्यकीय ज्ञानाचा वारसा मिळाला होता पण युरोपात ख्रिस्ती आणि ज्यू धर्माचा पगडा असल्याकारणाने अरब वैद्यांना त्यांना दुय्यमत्व मिळाले.कारण ख्रिस्ती धर्मात मध्ययुगीन कालखंडात आणि साधू संत यांच्या नावाने चमत्काराचे नियम सामान्य लोकांवर लादले गेले.सामान्य मनुष्य धर्माच्या आवरणात सापडल्यामे त्यांचे निघता येईना.यामुळेच याकाळ ज्यू धर्माने चमत्कार आणि परंपरागत पद्धतीने वैद्यकीय नियमांचे पालन केले.पवित्रशास्त्र सांगते.**''आपल्या ठाई पाप नाही असे जर आपण म्हणत असलो,तर आपण स्वत:ला फसवितो व आपल्या ठाई सत्य नाही.जर आपण आपली पापे पदरी घेतली,तर तो विश्वास्नियंव न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील.''७** ज्यू धर्म आणि ख्रिस्ती धर्माच्या विकासात पवित्रशास्त्राची महत्वपूर्ण भूमिका राहिलेली आहेत्याकाळी अनेक धर्मगुरूंनी वरील वचनाची फुट पाडून लोकांना त्याचे असत्य शिक्षण दिले.त्यामुळे लोक जास्त अंधश्रद्धाकडे वळले.आणि वैद्यकीय शास्त्राच्या वापर चमत्काराच्या नावाने होऊ लागला.लोक त्याकाळी चमत्कारच म्हणजेच वैद्यकशास्त्र अशी व्याख्या करू लागले.

एकंदरीत ख्रिस्ती,ज्यू आणि अरब या तिन्ही वैद्यकीय पद्धतीत प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडात सारखेच बद्दल होत गेले.फक्त धर्मतत्वांच्या वेगळेपणाने त्याला वेगवेगळ्या स्वरूपात टाकण्यात आले.आणि पुढे जाऊन वैद्यकीय क्षेत्राला विज्ञानाचा दर्जा प्राप्त झाला.

**संदर्भग्रंथसूची-**

१) मराठी विश्वकोष,खंड-१७-विज्ञानाचे तत्वज्ञान ते शेक्सपिअर, विल्यम,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मित मंडळ,मुंबई. पृ-क्र-२२०.
२) ''पवित्रशास्त्र,नवा करार,रोमकरास पत्र:-८-६
३) उपरोक्त,मराठी विश्वकोष,खंड-१७-विज्ञानाचे तत्वज्ञान ते शेक्सपिअर. पृ-क्र-२२०.
४) उपरोक्त ,मराठी विश्वकोष,खंड-१७-विज्ञानाचे तत्वज्ञान ते शेक्सपिअर. पृ-क्र-२२०.
५) उपरोक्त मराठी विश्वकोष,खंड-१७-विज्ञानाचे तत्वज्ञान ते शेक्सपिअर. पृ-क्र-२२०.
६) पवित्रशास्त्र,नवा करार,१ योहान:-१:-८-9
७) पूर्वोक्त,मराठी विश्वकोष,खंड-१७-विज्ञानाचे तत्वज्ञान ते शेक्सपिअर. पृ-क्र-२२०.